नाशिक मनपा निवडणूक चार सदस्यीय प्रभागप्रमाणे

शासन आदेश जारी; नगरसेवक संख्या वाढण्याची शक्यता

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक महापालिकेची निवडणूक चार सदस्य प्रभाग रचनेप्रमाणेच होणार आहे. याबाबतचे आदेश आज सायंकाळी नाशिक महापालिकेला प्राप्त झाले आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहे. २०१७ ची निवडणूक देखील चार सदस्य प्रभाग रचनेनुसार झाली होती. यावेळी नाशिक महापालिकेत भाजपची एकहाती सत्ता आली होती.

महानगरपालिका निवडणुकांसाठी प्रभाग रचना तातडीने सुरू करण्याचे आदेश राज्य शासनाने मंगळवारी (दि.१०) जारी केले आहेत. मुंबई महापालिका वगळून अ, ब व क दर्जाच्या महापालिकामध्ये ही चार सदस्य प्रभाग रचना करण्याचे आदेशात म्हटले आहे. त्यात ब वर्गात नाशिक महापालिकेच्या देखील समावेश आहे. शहरातील प्रभाग संख्या वाढून नगरसेवकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

प्रभाग रचना जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे होईल. सरासरी लोकसंख्या ठरविण्यासाठी एकूण लोकसंख्या भागिले एकूण सदस्य संख्या गुणिले प्रभागातील सदस्य संख्या हे सूत्र वापरले जाईल. प्रभागाची लोकसंख्या सरासरीच्या १० टक्के कमी-जास्त असू शकते; अपवादात्मक कारणांसह यापेक्षा जास्त असू शकते. दरम्यान महानगरपालिका आयुक्त प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करतील आणि राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करतील. यानंतर हरकती-सूचनांवर सुनावणी होऊन अंतिम रचना जाहीर होईल. प्रभागांचे नकाशे गुगल अर्थवर तयार होऊन, प्रगणक गट, लोकसंख्या आणि सीमा स्पष्ट दर्शविल्या जातील. ही प्रक्रिया पारदर्शक आणि न्याय्य राहावी, यासाठी आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना विशेष काळजी घेण्याचे निर्देश आहेत. गोपनीयता भंग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होईल. निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य राखण्यासाठी सर्वतोपरी दक्षता घेतली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

२०१७ साली भाजपने नाशिक महापालिकेवर एक हाती सत्ता काबीज केली होती. मात्र तीन वर्षांपासून पालिकेत प्रशासक राजवट सुरु आहे. मात्र महापालिका निवडणूक कधी होणार, याकडे सर्व पक्षीयांच्या नजरा लागल्या होत्या. अखेर याप्रकरणी राज्य शासनाने मंगळवारी महापालिका प्रशासनला प्रभाग रचना तयार करण्याचे आदेश दिले. यानंतर सर्व पक्षीयामध्ये हालचाली सुरु झाल्या आहेत.

देशदूतचे वृत्त खरे ठरले

नाशिक महापालिका निवडणूक चार सदस्य प्रभाग रचनेप्रमाणे होणार अशी बातमी देशदूतने मंगळवारी प्रसिद्ध केली होती. तसेच, आदेश मंगळवारी शासनाने काढल्याने देशदूतचे वृत्त खरे ठरले.

देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
10 Jun 2025 - Page 1

नाशिक मनपा निवडणुकीसाठी चार सदस्यीय प्रभागरचना?

प्रशासनाकडून हालचाली; निर्णय राज्य सरकार घेणार

नाशिक । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. मुंबई महापालिका वगळता राज्यातील इतर सर्व महापालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार आहेत. त्यासाठी महाविकास आघाडी सरकारच्या तीन सदस्यीय प्रभागरचना रद्द करून, महायुती सरकार पुन्हा चार सदस्यीय प्रभाग रचनेला पसंती देणार असल्याचे समजते. त्यामुळे नाशिक मनपा निवडणूक २०१७ प्रमाणे चार सदस्यी प्रभाग प्रमाणप्रमाणे होण्याची शक्यता आहे.

शासनाने प्रभागरचनेबाबत मनपाला लेखी आदेश दिलेले नसले तरी मनपा

पान १० वर >>

भाजपचे संघटन मजबूत असून बूथ स्तरावरून आमची रचना पूर्ण झाली आहे. नाशिक महापालिका निवडणूक कोणत्याही पद्धतीने झाली तरी आम्ही शंभर प्लस जागा जिंकून महापालिकेत सत्ता स्थापन करणार.

– सुनील केदार, नाशिक शहराध्यक्ष, भाजप

प्रभागरचना एक सदस्यीय असो वा चार सदस्यीय; आमची तयारी पूर्ण झाली असून, प्रभागनिहाय बैठका सुरू झाल्या आहेत. नाशिक महापालिकेवर पुढची सत्ता आमचीच राहणार.

– डी. जी. सूर्यवंशी, नाशिक जिल्हाप्रमुख, शिवसेना (ठाकरे)

महत्त्वाचे

खा. गोपचोडे यांचा सत्कार

नाशिक । भाजप वैद्यकीय आघडीतर्फे मंगळवारी नाशिक येथे खा. अजित गोपचोडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. प्रशांत पाटील,डॉ. चंद्रशेखर नामपूरकर, डॉ. विश्वनाथ पाटील,डॉ. मंजुषा दराडे आदी उपस्थित होते.

ग्रीन जिम उपकरणे नादुरूस्त

नाशिक । नवीन नाशिकमधील उद्यानांमध्ये बसवलेली बऱ्याच ठिकाणाची ग्रीन जिम उपकरणे सध्या नादुरुस्त आहेत. उपकरणे गंजलेली, तुटलेली असून वापरण्यायोग्य नाहीत. त्यामुळे व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेने देखभाल व दुरुस्ती न केल्याने व्यायामप्रेमींमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

कायदे मिल्लत नाशिक दौऱ्यावर

नाशिक । इस्लाम धर्माचे ज्येष्ठ

धर्मगुरू शहेज़ादा-ए-मखदूमे सिमना कायदे मिल्लत हज़रत मौलाना सय्यद मोहम्मद महेमुद अशरफ अशरफी उल जिलानी दोन दिवसांच्या नाशिक दौऱ्यावर येत आहे. आज (दि.११) सायंकाळी आठ वाजता त्यांचे प्रवचन बडी दर्गा शरीफ येथील मैदानावर होणार आहे. तर गुरुवारी (दि.१२) सायंकाळी चौक मंडई येथून उर्स-ए-शहंशाहे नाशिक यांच्या खास संदल मिरवणुकीचे ते नेतृत्व करणार आहे. भाविकांनी दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन खतीबे नाशिक हाफीज हिसामुद्दीन अशरफी, अकरम खतीब आदींनी केले आहे.

बडी दर्गा संदल-ए-खासनिमित्त प्रवचन

नाशिक । येथील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थानी असलेले शहेंशाहे नाशिक हज़रत पिर सय्यद सादीक शाह हुसैनी बाबा (बडी दर्गा) यांच्या पवित्र संदल-ए-खासनिमित्त तीन दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी नात शरीफचा कार्यक्रम झाला. यावेळी मुंबईचे प्रसिध्द नातखाँ शादाब रजवी व नागपुरचे गुफरान रजा कादरी यांनी नात शरीफ पठण केले. यावेळी अब्दुल कादीर जिलानी मियाँ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर बुधवारी कायदे मिल्लत सय्यद मोहम्मद महेमुद अशरफ यांचे प्रवचन होणार आहे.

अमृतवन परिवाराचे वृक्षारोपण

नाशिक । अमृतवन परिवाराच्या वतीने शिवराज्याभिषेकाच्या त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भाजप शहराध्यक्ष सुनिल केदार प्रमुख अतिथी होते. प्रत्येकाने एक रोप दत्तक घेत देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते उत्तमराव उगले, पंचवटी मंडलाध्यक्ष राहुल कुलकर्णी, महानगर सचिव अमित घुगे, बबनराव ढगे आदी उपस्थित होते.

मी शिवसेनेतच काम करणार

विलास शिंदे यांची स्पष्ट भूमिका; पुढील आठवड्यात नाशिकमध्ये बैठक

नाशिक । प्रतिनिधी

शिवसेना (उबाठा) संघटनेने मला वेळोवेळी सर्व काही दिले आहे. पक्षात निर्णय प्रक्रियेबाबत काही अपेक्षा होत्या, त्या पूर्ण झाल्या नाहीत, म्हणून नाराजी होती. मात्र, ती नाराजी मी पक्षातील वरिष्ठांपुढे स्पष्टपणे मांडली आहे. त्यामुळे पक्ष सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, अशी स्पष्ट भूमिका उबाठा गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांनी दैनिक देशदूतशी बोलताना मांडली.

मध्यंतरी शिवसेनेत जिल्हाध्यक्ष बदलण्याची प्रक्रिया सुरू होती. सुधाकर बडगुजर यांनी पद सोडल्याचे जाहीर केल्यानंतर, ज्येष्ठत्वाच्या नात्याने हे पद आपल्याला मिळावे, अशी माझी अपेक्षा होती. ती अपेक्षा पूर्ण झाली नाही, आणि म्हणूनच नाराजी व्यक्त केली होती, असे विलास शिंदे यांनी सांगितले.

तरीसुद्धा, नंतर झालेला पक्ष मेळावा यशस्वी करण्यासाठी त्यांनी पूर्ण योगदान दिले होते. त्यानंतर त्यांच्या मुलीचे लग्नकार्य होते. त्या काळात त्यांनी पक्षाच्या वरिष्ठांना सांगून, परवानगी घेऊन काही काळ पक्षकार्यापासून विरंगुळा घेतला होता. त्यामुळे एखाद्या कार्यक्रमाला गैरहजर राहिलो, हे नाराजीचे लक्षण मानणे चुकीचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिंदे पुढे म्हणाले, मी मागील ३० वर्षांपासून शिवसेनेत कार्यरत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी माझे चांगले सामाजिक संबंध आहेत. त्यांच्या घरातील शुभकार्याला मी निमंत्रण दिले होते आणि तेही लग्नाला आले. त्यानंतर अजय बोरसे यांच्या कार्यातही भेट झाली. याचा अर्थ पक्षातून बाहेर पडण्याची तयारी असल्याचा अर्थ लावणे चुकीचे आहे.

पक्षाच्या खासदारकीच्या आणि आमदारकीच्या निवडणुकांमध्येही आपण संघटनेसोबत ठामपणे उभे राहिलो. सुधाकर बडगुजर यांना उमेदवारी द्यावी, ही मागणीही आम्हीच केली होती आणि जिंकण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यामुळे आता पद मिळाले नाही म्हणून पक्ष सोडण्याचा विचारच नाही. मी पक्षातच आहे आणि कार्य सुरूच ठेवणार, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. दरम्यान, पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी विलास शिंदे यांना मुंबईत बोलावून भेट घेतली असून, संपूर्ण वृत्तांत समजून घेतला आहे. पुढील आठवड्यात नाशिकला येतो व बैठक घेतो, असे आश्वासन त्यांनी दिल्याचे विलास शिंदे यांनी सांगितले.

सय्यद अली शाहबाबांचा संदल

नाशिक । प्रतिनिधी

त्र्यंबकरोडवरील ठक्कर बाजार बसस्थानकाजवळ हजरत पीर सय्यद तुराब अली शाह बाबा यांचा संदल शरीफ उत्साहात धार्मिक पध्दतीने साजरा झाला. शहरे खतीब हाफिज हिसामोद्दीन अशरफी यांच्या हस्ते चादर अर्पण करण्यात आली. यावेळी प्रतिवर्षाप्रमाणे परिसरात संदलची मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी नाजिम खान, मुदस्सर खान यांनी परिश्रम घेतले. यावेळी माजी नगरसेवक हाजी निजाम कोकणी, अन्वर खतीब, विशाल बनकर, रिजवान खान, माजी नगरसेवक सुफी जीन, शेखन खतीब, हनीफ पठाण, आरीफ मन्सुरी, जावेद शेख, इमरान शेख, इरफान शेख, अप्पा कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते, अशी माहिती बबलू मिर्झा यांनी दिली.

सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर विशेष सुशोभीकरण

नाशिक । प्रतिनिधी

दर बारा वर्षांनी नाशिकमध्ये

होणारा सिंहस्थाची तयारीने आता वेग घेतला आहे. मनपा प्रशासन यंत्रणा विविध सुविधा पुरविण्याबरोबर शहरात विशेष सुशोभीकरण करणार आहे. त्याचप्रमाणे देशातील इतर ठिकाणी भरणाऱ्या कुंभच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील विविध भागांना कलर कोडिंगप्रमाणे थीम देण्याचा विचार सुरू आहे.

शहराच्या सुशोभीकरणाच्या नवनवीन संकल्पना राबविण्याचा प्रशासनाचा मानस आहे. नाशिक शहरातील विविध भागांना मनपा कलर कोडिंगची थीम देणार आहे. महापालिकेच्या मुख्यालयासमोरील इमारतींपासून या नवीन प्रयोगाला सुरूवात होणार आहे. ज्या प्रमाणे पिंक सिटी म्हणून जयपूरची ओळख आहे.तशी नाशिक शहरात अशा प्रकाराच्या प्रयोगाची सुरुवात करण्यात येणार आहे. महापालिकेच्या बांधकाम विभागाने या संदर्भातील प्रस्ताव तयार केला असून शहरातील विविध भागातील मुख्य रस्त्यांवरील व्यापारी संकुलांना एक सारखा रंग देण्याचा प्रस्ताव आहे. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर हा वेगळा प्रयोग मनपाच्या वतीने साकारण्यात येणार आहे. सध्या ज्या प्रमाणे मुंबईनाका भागात एका दवाखाना मार्फत रामायण थीम देऊन उड्डाणपुलाचे पिलर रंगविण्यात आले आहे. तसाच प्रयोग शहरात करण्याचा मनपाचा प्रयत्न आहे.

बडगुजर यांच्या भाजप प्रवेशाविरोधात निवेदन

नाशिक । सुधाकर बडगुजर यांना भाजपमध्ये प्रवेश देऊ नये, याकरिता आ. सीमा हिरे यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण व मंत्री गिरीश महाजन यांना निवेदन दिले.

शिवसेना उपनेते पदावरून सुधाकर बडगुजर यांची हकालपट्टी केल्यानंतर त्यांचा भाजपमध्ये प्रवेश होणार असल्याची चर्चा असल्याने आ. सीमा हिरे यांनी उघडपणे बडगुजरांच्या प्रवेशाला पत्रकार परिषद घेऊन विरोध दर्शविला होता. दरम्यान मंगळवारी (दि. १०) आ. सीमा हिरे यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवकांसह भाजप पदाधिकाऱ्यांनी ज्येष्ठ नेत्याची भेट घेऊन निवेदन दिले. या निवेदनात असे नमूद करण्यात आले की, २२ वर्षांत बडगुजरांवर २९ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. एका गुन्ह्यात त्यांना दीड वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. मुंबई बॉम्ब स्फोटातील आरोपी दाऊद, सलीम कुत्ता या देशद्रोह्यांशी संबंध आहेत. त्यांच्यावर हद्दपारीची कारवाई देखील झाली आहे. या निवेदनात बडगुजर यांच्याविरुद्ध पोलीस ठाणेनिहाय गुन्ह्यांची यादी देण्यात आली. यावेळी सर्व ज्येष्ठांनी यावर विचार करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी शिष्टमंडळात आ. हिरे यांच्यासह ॲड. श्याम बडोदे, माधुरी बोलकर, भगवान दोंदे, सतीश सोनवणे, कावेरी घुगे, प्रतिभा पवार, भाग्यश्री ढोमसे, छाया देवांग, अलका अहिरे, पुष्पा आव्हाड, राकेश दोंदे, मुकेश शहाणे, दिपाली कुलकर्णी, सुप्रिया खोडे आदी माजी नगरसेवकांसह मंडल अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

मनपा करणार पालखीचे पारंपरिक पद्धतीने स्वागत

नाशिक । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणारी पायी वारकरी दिंडी आणि संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी आज दि.११ जून रोजी नाशिकनगरीत प्रवेश करणार आहे. यानिमित्ताने शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, नाशिक महानगरपालिका आणि निवृत्तिनाथ महाराज स्वागत समिती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या पालखीचे पारंपरिक स्वागत पंचायत समिती कार्यालय, त्र्यंबकरोड येथे करण्यात येणार आहे.

यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्यासह अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त नितीन पवार, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय पाथरुट, मुख्य लेखा परीक्षक बळवंत गायकवाड आदी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात निवृत्तिनाथ महाराज सामाजिक

सेवा संघाचे अध्यक्ष पद्माकर पाटील, सरचिटणीस सचिन डोंगरे, रत्नाकर चुंभळे, राहुल बर्वे, कैलास सोनवने व इतर समिती सदस्य उपस्थित राहतील. वारकऱ्यांचे स्वागत ही नाशिकच्या आध्यात्मिक आणि सेवाभावी परंपरेचा भाग असून, या प्रसंगी विणेकरी, मानकरी, पालखी प्रमुख यांचा विशेष सत्कार सोहळा १२ जून रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच वारीत सहभागी होणाऱ्या सर्व पायी वारकरी भाविकांचे मनोभावे स्वागत करण्यात येणार असून त्यांच्यासाठी अल्पोपहार, चहा-पाण्याची सुविधा, वैद्यकीय तपासणी व प्राथमिक उपचार, स्वच्छतागृहे आदी सुविधा महानगरपालिका व समितीच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली आहे.

गोदापार्क आऊटसोर्सने देणार

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक मनपात मागील सुमारे पंचवीस वर्षांपासून नोकरभरती झालेली नाही. त्यामुळे त्याचा परिणाम विविध विकास कामांसह इतर कामांवर होत आहे. आता मनपा मनुष्यबळाअभावी शहरातील गोदा पार्कसह चार मोठ्या उद्यानांची देखभाल, दुरुस्ती खासगीकरणातून करणार आहे. यासाठी मनपाच्या उद्यान विभागाने निविदा प्रसिध्द केली असून तसा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी देखील ठेवण्यात आला आहे.

शहरात मनपाचे सुमारे ५५० उद्याने असून त्यातील निवडक उद्यानांना मनपा आऊटसोर्सवर देणार आहे. त्याच गोदा पार्कचे संपूर्णपणे खासगीकरण केले जाणार आहे. या ठिकाणी प्रवेशासाठी देखील तिकिट राहणार आहे. दरम्यान या ठिकाणी ॲम्फी थिएटर, वेगवेगळ्या पद्धतीचे कारंजे तसेच खाद्यपदार्थ विक्रीचे स्टॉल्स उभारण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे स्वा. बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यानाचे नूतनीकरण करून या ठिकाणी विविध प्रकारचे ॲडव्हेंचर स्पोर्ट्स तयार करण्यात आले आहेत. या ठिकाणी प्रवेश निशुल्क असेल तरी विविध ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटीसाठी वेगवेगळ्या पद्धतीचे शुल्क ठेवण्यात येणार आहे. या ठिकाणी हेरिटेज बिल्डिंग असून, त्या ठिकाणी चांगले रेस्टॉरंट व अन्य सुविधा दिल्या जातील. नाशिक रोड येथील उद्यानामध्ये वेगवेगळ्या पद्धतीची खेळणी बसवण्यात आली असून, या ठिकाणीही किरकोळ दर आकारून प्रवेश दिला जाणार आहे. नवीन नाशिक येथील पेलिकन पार्क या ठिकाणी प्रवेश निःशुल्क असेल मात्र आतील ॲक्टिव्हिटीसाठी वेगवेगळ्या पद्धतीचे शुल्क घेतले जाईल. या ठिकाणी असलेल्या गाळ्यांचे लिलाव करून त्यांना भाडे तत्वावर दिले जाणार आहे.

प्रेमासाठी नाशिकचा तरुण बांगलादेशात

आयुक्तालयाने घेतले ताब्यात

नाशिक । प्रतिनिधी

भूक, तहान सोडून केवळ प्रेमात विसरलेल्या नाशिकच्या एका तरुणाने बागलादेशी तरुणीशी प्रेमाच्या आणाभाका घेत 'संसार' सुरु केल्याचे समोर आले आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाल्यावर त्यांनी विवाह करुन भारत व बांग्लादेश या देशांच्या नियमांसह कायदा बाजूला ठेवल्याचे उघड होत असून आता नाशिक शहर पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळालेल्या माहितीद्वारे मंगळवारी (दि. १०) एका विशेष पथकाने दोघांनाही ताब्यात घेतले आहे.

बांगलादेशातून घुसखोरी करुन ही तरुणी अर्थात विवाहिता पाच वर्षांपूर्वी नाशिकमध्ये पोहोचल्याचे तपासात समोर आले आहे. मूळ बांगलादेशातील व सध्या महाराष्ट्रातील नाशिक शहरात एका तरुणासोबत विवाहानंतरचे जीवन जगणाऱ्या २८ वर्षीय तरुणीसह एका पस्तीस वर्षीय तरुणाला गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. दोघांच्याही कागदपत्रांची पडताळणी करुन कसून चौकशी करण्यात आली असून तरुणीचे संपूर्ण शिक्षण बांगलादेशात झाले असले, तरी तिच्याकडे कोलकातामधील एका शाळेचा संशयास्पद दाखला आहे. यासह तिने 'गॅझेटिअर'द्वारे नावात बदल करुन भारतात आधारकार्ड, पॅनकार्ड आणि मतदान कार्ड काढल्याचेही समोर येत आहे.

ठळक मुद्दे

* सन २०१९ ते २०२२ पर्यंत दोघेही भारतात एकत्र वास्तव्यास.
* त्यानंतर दोघेही बांगलादेशात गेले.
* तरुणाने धर्म बदलून तिच्याशी विवाह केला.
* पुन्हा दोघे भारतात आले व नाशिकमध्ये स्थायिक झाले.

तिथे विवाहास विरोध

सन २०१८ मध्ये नाशिकच्या तरुणाची बांगलादेशातल्या तरुणीसोबत सोशल मीडियावर ओळख झाली. तरुणी अनधिकृतरित्या बांगलादेशातून मुंबईत आली. तेथील एका ठिकाणी दोघांची वारंवार भेट व शरीरसंबंध झाले. काही महिन्यांनी पुन्हा छुप्या पद्धतीने तरुणीने बांगलादेश गाठले. तिथे गरोदर असल्याचे समजल्यावर तिने नाशिकच्या तरुणाला कळवले. काही महिन्यांनी पासपोर्ट व व्हिसाद्वारे तरुण बांगलादेशात पोहोचला. मात्र, तरुणी मुस्लिम व तरुण हिंदू असल्याने बांगलादेशात त्यांच्या विवाहाला तीव्र विरोध झाला. तरुण पुन्हा भारतात आला. त्या कालावधीत तिने गोंडस मुलीसा जन्म दिला. त्यानंतर पासपोर्ट व व्हिसाद्वारे तिने बांगलादेशहून पुन्हा भारतात प्रवेश केला.

कायद्याचा अडसर

तरुणीने वारंवार गैरमार्गाने भारतात प्रवेश केला असून, तिने भारतात एकदा पासपोर्ट फाडला. दोघांचाही संसार सुरळीत असला तरी बेकायदेशीररित्या दोन देशांतील प्रवास आणि घुसखोरीमुळे त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. तिच्याकडे भारत देशातील आधार कार्डसह इतर बनावट कागदपत्रे असून तिने विधानसभा निवडणुकीत मतदानही केल्याचे कळते. याप्रकरणी मंगळवारी (दि. १०) रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु होती.

वृक्ष छाटणे महावितरणला पडले महागात

२५ लाखांचा दंड; मनपा उद्यान विभागाची नोटीस

नाशिक । प्रतिनिधी

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक मनपाच्या उद्यान विभागाकडून तसेच विद्युत विभागाकडून शहरातील धोकादायक वृक्षांच्या फांद्या छाटण्याचे काम सुरू आहे, मात्र काही ठिकाणी मनपाची विनापरवानगी न घेता वृक्ष छाटल्याने महावितरणकंपनीला मनपाच्या उद्यान विभागाने २५ लाखांच्या दंडाची नोटीस बजावली आहे.

नाशिक शहरातील महात्मानगर रस्त्यावरील ५० झाडांची विनापरवानगी छाटणी केल्याप्रकरणी महापालिकेने ही नोटीस दिली आहे. पावसाळ्याच्या अगोदर महावितरणतर्फे शहरासह विविध भागात झाडांची छाटणी करण्यात येते. ज्या ठिकाणी झाडे उंच वाढलेली असतील किंवा रस्त्यात फांद्या आल्या असतील, तेथे वीज तारांचा स्पर्श होवून

दुर्घटना घडू नये म्हणून महावितरणतर्फे दरवर्षी फांद्या छाटल्या जातात. परंतू या फांद्या छाटण्यासाठी महावितरणच्या विभागाला महापालिकेची परवानगी घ्यावी लागते. यावेळी त्यांनी परवानगी न घेता सर्रास फांद्याची छाटणी केली. हे महापालिकेच्या उद्यान विभागाच्या लक्षात येताच त्यांनी महावितरणला २५ लाख रूपयांचा दंड ठोठावला.

महावितरणने मनपाची परवानगी न घेता फांद्या छाटल्या तर शहरात अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्याचा पालापाचोळा रस्त्यावर पडलेला होता. त्यामुळे अनेक नागरिकांची गैरसोय झाली. कोणत्याची वृक्षाची छाटणी करण्यासाठी महापालिकेची परवानगी आवश्यक आहे. आम्ही कायदेशीर नोटीस दिली आहे.

-विवेक भदाणे, उद्यान अधीक्षक, मनपा